# भा. कृ. अनु. प.- केंद्रीय कपास अनुसंधान संस्थान, नागपुर

# ICAR-central Institute for Cotton Research, Nagpur

An ISO 9001:2015 Certified Organisation

## कापूस हंगाम २०२५-२६: साप्ताहिक एकोणतीसावा पीकसल्ला

## १५ डिसेंबर ते २१ डिसेंबर २०२५

| महाराष्ट्र | | मागील आठवड्यातील प्रत्यक्ष पाऊस (मिमी) | | | | | | पडणाऱ्या पावसाचा अंदाज (मिमी) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | डिसेंबर | | | | | | डिसेंबर | | | | |
| | | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
|  | धुळे | | | | | | | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | नंदुरबार | 0 | 0 | 0 | 0 | | | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | जळगाव | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | अहमदनगर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | औरंगाबाद | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | जालना | | | | | | | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | बीड | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | नांदेड | | | | | | | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | परभणी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | हिंगोली | | | | | | | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | बुलढाणा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | अकोला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | वाशीम | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | अमरावती | 0 | 0 | 0 | 0 | | | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | यवतमाळ | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | वर्धा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | नागपूर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | चंद्रपूर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पावसाचे प्रमाण आणि रंग कोड | 0.1 to 2.4 मिमी | 2.5 to 15.5 मिमी | 15.6 to 64.4 मिमी | 64.5 to 115.5 मिमी | 115.6 to 204.4 मिमी |
| पावसाची श्रेणी | खूप हलका पाऊस | तुरळक पाऊस | मध्यम स्वरूपाचा पाऊस | मुसळधार पाऊस | अति मुसळधार पाऊस |

**पीक स्थिती:**

अकोला येथे वेचणी शेवटच्या टप्प्यात सुरू आहे.

नांदेड येथे वेचणी सुरू आहे.

राहूरी येथे वेचणी शेवटच्या टप्प्यात सुरू आहे.

**पीक सल्ला :**

अकोला येथे शेतकऱ्यांना कापसाची स्वच्छ वेचणी करण्यास प्राधान्य देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. वेचलेला कापूस वाणानुसार वेगळा साठवावा. पुढील हंगामात गुलाबी बोंडअळीचा (PBW) प्रादुर्भाव टाळण्यासाठी डिसेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत कापसाची काढणी/वेचणी पूर्ण करावी. लवकर येणाऱ्या बीटी कापसाच्या वाणांची काढणी झाल्यानंतर, सिंचनाची सुविधा उपलब्ध असल्यास अधिक आर्थिक लाभासाठी हरभरा किंवा गहू हे दुसरे रब्बी पीक घ्यावे. कापसाची स्वच्छ वेचणी करण्यास प्राधान्य द्यावे.

नांदेड येथे शेतकऱ्यांना वेचणीनुसार कापसाचे बी वेगळे साठवण्याचा सल्ला देण्यात येत आहे. साठवणुकीपूर्वी कापूस शेडमध्ये वाळवावा. कापसाची स्वच्छ व सुरक्षित वेचणी करण्यासाठी कापूस वेचणी एप्रनचा वापर करावा. रॅटून पद्धत टाळावी व कापसाची दुसरी वेचणी झाल्यानंतर पीक नष्ट (समाप्त) करावे.

राहुरी येथे शेतकऱ्यांना चांगली उघडलेली बोंडे व नुकसान झालेली बोंडे वेगवेगळी वेचून ती कोरड्या ठिकाणी स्वतंत्रपणे साठवण्याचा सल्ला देण्यात येत आहे. रब्बी हंगामासाठी शक्य तितक्या लवकर कापसाचे पीक समाप्त करावे. गुलाबी बोंडअळीचा पुढील हंगामातील प्रादुर्भाव कमी करण्यासाठी शेवटच्या वेचणीनंतर शेतात मेंढ्या व शेळ्यांना चरण्यास सोडावे. शक्य असल्यास श्रेडरच्या साहाय्याने कापसाच्या काड्या चिरून जमिनीत मिसळाव्यात. तंबाखू स्ट्रीक व्हायरस (TSV) नेक्रोसिस रोगाचा प्रसार टाळण्यासाठी पार्थेनियम तणाचे नियंत्रण करावे. रोगग्रस्त बोंडे व पिकाचे अवशेष शेतातून गोळा करून नष्ट करावेत. डिसेंबर महिन्याच्या अखेरीस पीक समाप्त करावे. निरोगी व गुलाबी बोंडअळीग्रस्त कापूस वेगळा वेचून तो कोरड्या ठिकाणी स्वतंत्रपणे साठवावा, जेणेकरून बाजारात चांगला दर मिळू शकेल.

**Advisory issued by**
Dr Vijay N Waghmare, Director, ICAR-Central Institute for Cotton Research, Nagpur

**Compilation and editing Team:**
Dr. G. T. Behere, Dr A. S. Tayade, Dr. Vinita Gotmare, Dr. A. H. Prakash, Dr. Rishi Kumar, Dr V. S. Nagrare, Dr Babasaheb B. Fand, Dr Ramkrushna GI, Dr. Shailesh Gawande, Dr Shivaj Thube, Dr. Isabella Agarwal Dr S. K. Sain, Mr Sachin Wankhede, Mr Prashant Gaikwad

**Regional language translation**:
Punjabi: Dr Amarpreet Singh; Tamil: Dr A. Manikandan & Dr M Saravanan; Telugu: Dr L. Rajesh Chaudhary; Marathi: Dr Vrushali Deshmukh & Mrs Pooja Ghonge; Hindi: Mr Ghanshyam Deogirikar & Mr Ashutosh Mishra; Gujrati: Dr H R. Desai & Dr Vivek Shah; Oriya: Dr B. S. Nayak; Kannad: Dr Neelkanth Hiremani